**मे. टी.आय.सायकल ऑफ इंडीया (युनीट ऑफ ट्युब इन्व्हेस्टमेंट ऑफ इंडीया लि.), प्लॉट नं. ई-८, एमआयडीसी माळेगांव, ता. सिन्नर, जि. नाशिक यांच्या प्रस्तावित कोल्ड रोल्ड स्टील स्ट्रिप्सची प्रक्रिया – कार्बन स्टील प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचा इतिवृत्तांत :**

.....................................................................................................................................................

मे. टी.आय.सायकल ऑफ इंडीया इंडीया (युनीट ऑफ ट्युब इन्व्हेस्टमेंट ऑफ इंडीया लि.), प्लॉट नं. ई-८, एमआयडीसी माळेगांव, ता. सिन्नर, जि. नाशिक, महाराष्ट्र या उदयोगाच्या खालीलप्रमाणे प्रस्तावित उत्पादनासाठी पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली दि. ०८ मार्च २०२३ रोजी दुपारी १२-०० वाजता पार पडली.

कोल्ड रोल्ड स्टील स्ट्रिप्सची प्रक्रिया – कार्बन स्टील प्रकल्पासाठी १०,००० टन प्रति महिना (१,२०,००० टन प्रति वर्ष)

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्रं. ई - २१ / २०२३ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २३०३०३ – एफटीएस– ००९ दि. ०३/०३/२०२३ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे अधिकारी सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

१) जिल्हाधिकारी, नाशिक, - अध्यक्ष

२) प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक - सदस्य
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, - संयोजक
नाशिक

श्री. अमर दुर्गुळे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ नाशिक तथा संयोजक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली. संयोजक यांनी सदर पर्यावरण विषयक सुनावणी बाबतचे महत्व तसेच याबाबत केलेल्या कार्यप्रणालीची माहिती दिली.

संयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री.अमर दुर्गुळे, संयोजक यांनी असे सांगितले की म.प्र.नि. मंडळास प्रकल्प प्रवर्तक मे. टी.आय.सायकल ऑफ इंडीया इंडीया (युनीट ऑफ ट्युब इन्व्हेस्टमेंट ऑफ इंडीया लि.), प्लॉट नं. ई-८, एमआयडीसी माळेगांव, ता. सिन्नर, जि. नाशिक यांच्या प्रस्तावित कोल्ड रोल्ड स्टील स्ट्रिप्सची प्रक्रिया – कार्बन स्टील प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदर अर्जाच्या अनुशंगाने मा. जिल्हाधिकारी नाशिक यांनी सदरची सुनावणी दि.०८.०३.२०२३ रोजी दु. १२.०० वाजता घेण्याबाबत निर्देशित केले.

त्याअनुशंगाने सदर वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. अनुषंगाने उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ नाशिक यांनी स्थानिक वृतपत्र मराठी दैनिक सकाळ व दैनिक टाइम्स ऑफ इंडीया या इंग्रजी यात दिनांक ०३.०२.२०२३ रोजी जनसुनावणीबाबत जाहीर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पा विषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

उप-प्रादेशिक अधिकारी तथा संयोजक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमुद केले की, सदर प्रकल्पा बाबत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ नाशिक यांचेकडे गृप ग्रामपंचायत कार्यालय, माळेगांव / मापारवाडी, मु.पो. माळेगांव (एमआयडीसी) / मापारवाडी, ता. सिन्नर, जि. नाशिक यांचे पत्र दि. ०९/०२/२०२३ प्राप्त झाले आहे. तसेच ज्या नागरिकांना या ठिकाणी काही लेखी / तोंडी आक्षेप नोंदवायचे असतील तर ते सदर सुनावणी दरम्यान नोंदवू शकतात.

मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी सदर सुनावणी सुरु करणेस परवानगी दिली.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार मे. एन्विरो ऍनालिस्टस अँड इंजिनिअर्स प्रा. लि.यांचे प्रतिनिधी यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले. जसे की,- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्रकल्पाचा तपशिल,

प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदय:स्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी.

सदर सुनावणी दरम्यान खालीलप्रमाणे मुददे उपस्थित करण्यात आले.

| अ.क्रं | टिका टिप्पणी, आक्षेप सुचना मुददा इत्यादी | उदयोगाच्या प्रतिनिधीने दिलेले उत्तर |
|---|---|---|
| १. | श्री. बबन वाजे<br><br>मालक श्री. स्वामी इंडस्ट्री. सिन्नर आणि सेक्रेटरी, सिन्नर इंडस्ट्रीयल असोसिएशन<br><br>सदर प्रकल्पातून ॲसिडयुक्त पाणी प्रकल्पा बाहेर पडेल काय? | उदयोगाने औदयोगिक सांडपाणी प्रक्रीया करण्यासाठी ३५ घनमीटर प्रतिदिन क्षमतेची औदयोगिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा (ETP) उभारण्याचे प्रस्तावित केले आहे. घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी १५ घ.मि. क्षमतेची घरगुती सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा (STP) उभारण्याचे प्रस्तावित केले आहे. तसेच झेडएलडी टेक्नॉलॉजीचा अवलंब करण्यात येईल. प्रक्रियाकृत सांडपाण्याचा प्रक्रियेमध्ये पुर्नवापर करण्याचे प्रस्तावित आहे. प्रक्रियाकृत सांडपाणी उदयोगाच्या आवारातील बाग बगीच्यासाठी वापरण्याचे प्रस्तावित आहे. वरील प्रस्तावित योजनांमुळे कोण्त्याही प्रकारचे सांडपाणी प्रकल्पा बाहेर पडणार नाही. |
| २. | श्री. किशोर राठी, अध्यक्ष सिमा तथा उपाध्यक्ष निमा सिन्नर<br><br>सदर उदयोगामधून किती रोजगार निर्मीती होईल? स्थानीक लोकांना रोजगार देतांना प्राधान्य देण्यात यावे. या कारखान्यामुळे सिन्नर औदयोगिक वसाहतीमधील | या उदयोगामध्ये पहिल्या टप्प्यात १५० लोकांना रोजगार उपलब्ध होईल तर तिस-या टप्प्यापर्यंत २५० कामगार व इतर कर्मचारी यांना रोजगार उपलब्ध होईल. सदर रोजगार देतांना आवश्यक त्या कौशल्याचा विचार करण्यात येऊन जास्तीत जास्त स्थानीकांना रोजगाराच्या संधी देण्यात येतील. सदर प्रस्तावित प्रकल्पाच्या उत्पादन प्रक्रियेमध्ये ॲसेम्ब्ली करण्यात येणार नाही. कोल्ड रोलींग व कटींग नंतर स्ट्रीप ग्राहकांना पुरविण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| | कारखान्यांना काही जॉब वर्कच्या संधी उपलब्ध होतील काय ? | स्थानीक उदयोगांना या उदयोगाशी निगडीत काम उपलब्ध करुन देण्यात येतील. |
| ३ | श्री. आशिष नहार<br><br>उपाध्यक्ष, निमा, सिन्नर<br><br>यापुर्वीच्या युनिटमध्ये जे कामगार काम करित होते त्यांचे पुनर्वसन करण्यात येईल काय ? तसेच हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेबाबतची माहिती बाबत विचारणा केली. | यापुर्वीच्या उद्योगामध्ये जे कामगार काम करित होते त्यांना नियमाप्रमाणे देय मोबदला देण्यात आला आहे. तथापि, नविन उदयोगास लागणारे कुशल मनुष्यबळ यापुर्वीच्या युनिटमध्ये काम करणा-या कामगारांमधुन उपलब्ध होत असल्यास त्याचा विचार करण्यात येईल.<br><br>हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी योग्य त्या उंचीचे धुरांडे, वॉटर स्क्रबर्स, डस्ट कलेक्टर्स आणि ध्वनीची पातळी कमी करण्यासाठी ध्वनी रोधक बसविण्यात येतील. तसेच मप्रनि मंडळाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार परिसरातील हवेची नियमितपणे तपासणी करण्यात येईल. |
| ४ | श्री. अरुण गाडेकर<br><br>सदर उदयोगामुळे ध्वनी प्रदूषण होईल काय? त्यावर कोणते उपाय करण्यात येतील? | सदर उदयोगामुळे उदयोगाच्या बाहेर ध्वनी प्रदूषण जाणवणार नाही. ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी वाहतुकीचे व्यवस्थापन करण्यात येईल व त्याचबरोबर पीयूसी असलेल्या उदयोगांनाच परवानगी देण्यात येईल. ध्वनी प्रदूषण नियंत्रणात राखण्यासाठी कमी आवाज निर्माण करणारी यूनिटस व ध्वनि रोधक (acoustic enclosures) बसविण्यात येतील. |
| ५ | श्री. बोडके<br><br>सदर उदयोगात acid recovery करण्यात येईल काय ? | सदर उदयोगात ॲसिड रिकव्हरी करण्यात येणार नाही. उद्योगातुन निर्माण होणारे टाकाऊ आम्ल हे पुन्हा प्रक्रिया करण्याकरीता म.प्र.नि.मंडळाने मान्यता दिलेल्या उद्योगाकडे पाठविले जाईल.सदर उदयोगात तयार होणारा घातक घनकचरा हा सामुहीक घातक कचरा प्रक्रिया केंद्राकडे शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी पाठविला जाईल. |

सदर सुनावणीपुर्वी ०१ लेखी निवेदन व सुनावणी दरम्यान ०५ लेखी निवेदने प्राप्त झाली. त्यांचे वाचन करण्यात येऊन उदयोगाच्या प्रतिनिधींनी संबंधित मुदयांना अनुसरुन माहिती दिली.

१. गृप ग्रामपंचायत कार्यालय, माळेगांव / मापारवाडी, मु.पो. माळेगांव (एमआयडीसी) / मापारवाडी, ता. सिन्नर, जि. नाशिक यांचे पत्र दि. ०९/०३/२०२३ सुनावणीपुर्वी प्राप्त झाले होते व त्याचे सुनावणी दरम्यान वाचन करण्यात आले.

**सदर प्रकल्पामुळे माळेगांव शिवारातील मानवी जीवनावर वातावरणातील बदलामुळे होणारे श्वसनाचे आजार, नैसर्गिक जलसाठे तसेच पशु व्यवसाय आणि मुख्यत्वे करुन शेती व्यवसाय आणि पर्यावरणावर या प्रकल्पाचा काय परिणाम होऊ शकतो याची सुस्पष्ट कल्पना देण्यात यावी.?**

कंपनीच्या प्रतिनिधींनी सांगितले की, प्रस्तावित उदयोगात जल प्रदूषण नियंत्रण करण्याकरिता अद्यावत जल प्रदुषण नियंत्रण संयंत्रणा बसविण्यात येणार असुन प्रकल्पातुन कोणत्याही प्रकारचे सांडपाणी बाहंर सोडले जाणार नाही. तसेच हवा प्रदूषणाबाबत योग्य ती हवा प्रदुषण नियंत्रण संयंत्रणा बसविण्यात येईल. प्रदुषण नियंत्रण सयंत्रणांचे मप्रनि मंडळाकडून वेळोवेळी मुल्यमापन करण्यात येते व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व इतर शासनाच्या संबंधित विभागांना वेळोवेळी अहवाल सादर करण्यात येतात. त्यामुळे आजुबाजूच्या परिसरातील शेती व्यवसाय व पर्यावरणावर कोणताही परिणाम होणार नाही.

२. ग्रामपंचायत कार्यालय, जामगांव, ता. सिन्नर, जि. नाशिक यांचे पत्र दि. ०८/०३/२०२३ व ग्रामपंचायत कार्यालय, सरदवाडी, ता. सिन्नर, जि. नाशिक यांचे पत्र दि. ०८/०३/२०२३ सदर सुनावणी दरम्यान प्राप्त झाले व त्याचे वाचन करण्यात आले.

**भविष्यात या कंपनीच्या उत्पादनामुळे आमच्या भागातील पिण्याच्या पाण्याची कमतरता, पाण्यातील क्षार वाढत रोगराई तसेच सदर कंपनीचे रासायनिक व अशुध्द पाणी पसरण्याची शंका आहे ?**

कंपनीच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, सदर प्रस्तावित उदयोगास एमआयडीसी कडुन पाणी उपलब्ध होणार आहे व प्रक्रीयाकृत सांडपाण्याचा वापर पुन्हा प्रकियेमध्ये तसेच उद्योगाच्या आवारातील बागबगीच्यासाठी करण्यात येणार आहे.प्रस्तावित उदयोगात जल प्रदूषण नियंत्रण करण्याकरिता अद्यावत जल प्रदुषण नियंत्रण संयंत्रणा बसविण्यात येणार असुन प्रकल्पातुन कोणत्याही प्रकारचे सांडपाणी बाहंर सोडले जाणार नाही. तसेच हवा प्रदूषणाबाबत योग्य ती हवा प्रदुषण नियंत्रण संयंत्रणा बसविण्यात येईल. प्रदुषण नियंत्रण सयंत्रणांचे मप्रनि मंडळाकडून वेळोवेळी मुल्यमापन करण्यात येते व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व इतर शासनाच्या संबंधित विभागांना वेळोवेळी अहवाल सादर करण्यात येतात त्यामुळे आजुबाजूच्या परिसरातील भागात पिण्याच्या पाण्याची कमतरता वा कंपनीचे रासायनिक व अशुध्द पाणी पसरण्याचा प्रश्न उदभवणार नाही.

३. सदर सुनावणीच्या अनुशंगाने श्री. भगवान भानुदास शेळके, श्री. सचिन विष्णु मोरे व श्री. प्रमोद नामदेव गवळी यांनी **कंपनीने बडतर्फ केलेल्या कारवाईच्या अनुशंगाने प्रलंबित न्यायालयीन खटल्याचा निर्णय लागेपर्यंत कोणताही निर्णय घेऊ नये अशी सुचना ई-मेल व्दारे केलेली आहे.** (सोबत प्रत जोडलेली आहे)

कंपनीच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, न्यायालयाच्या आदेशान्वये या बाबात योग्य तो निर्णय घेतला जाईल.

सदर जाहीर लोक सुनावणीचे संयोजक यांनी नमूद केले की, अजुनही कोणाला कांही लेखी किंवा तोंडी सुचना / आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात परंतु कोणीही मुददा उपस्थित केला नाही. त्यांनी पुढे नमुद केले की, सदर जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना सादर करण्यात येईल.

उपस्थितांचे आभार मानून अध्यक्षांच्या संमतीने सदर सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **( अमर दुर्गुळे )** | **( डॉ.रा.आ.राजपुत )** | **(डी.गंगाथरन)** 29/3/20.. |
| **संयोजक तथा उप्राअ** | **सदस्य तथा प्रा.अ.** | **अध्यक्ष तथा** |
| **मप्रनि मं. नाशिक** | **मप्रनि मं. नाशिक** | **जिल्हाधिकारी, नाशिक** |